
PLACID FILMS
सचिन शामराव जानकर प्रस्तुत प्लासिड फिल्म्स् निर्मित
मुक्ती
कल्पनेच्या बंधनातून
की बंधनांच्या कल्पनेतून
निर्माता सचिन शामराव जानकर दिग्दर्शक मच्छिंद्र मोरे
TECHNICOLOR
www.muktithefilm.in




आख्खं बगाडवाडी गाव आज भानाच्या विहिरीचं पाणी बघायला उत्सुक आहे आणि भानाचं दुर्दैव पुन्हा आडवं आलंय, ब्लास्टिंगच्या धमाक्यानं विहिरीतला काळा पाषाण फुटलाय खरा पण पाण्यानं दगा दिलाय. गावानं पुन्हा एकदा भानाची निर्भत्सना केलीय.

बगाडवाडीत आलेल्या आमदाराच्या सभेला सारं गाव निघून गेलंय; भानानं आता त्याच्या बायकापोरांचा विचार न करता आणि विफलतेच्या गर्तेत जाऊन त्या कोरडया विहिरीत उडी मारून जीव दिलाय....

शेतकऱ्यानं विफलते पोटी जीव देण्याची महाराष्ट्रातली अलिकडची परंपरा भानानं तंतोतंत पाळलीय, तो त्याच्या पुरता नामा निराळा झालाय आणि आता मागे उरलीय त्याची बायको, दोन मुलं आणि खंगलेला बाप. महाराष्ट्रात आजवर एकाही शेतकऱ्याच्या पत्नीनं आत्महत्या केल्याचं कुठे उदाहरण नाही. भानाची पत्नी बायजाला तिच्या मुलांच्यासाठी जगावच लागणार आहे, तीच नियती आहे तिची. मातेचा सक्षमपणाही बायजाच्या अंगी आहे पण सरकारी व्यवस्थेनं आणि समाजानं तिला जगू दिलंय का, खऱ्या अर्थानं जगतेय का ती ? आणि म्हणूनच "मुक्ती" चित्रपटातील बायजा ही महाराष्ट्रातल्या तमाम शेतकरी विधवांची प्रतिनिधी आहे.

आता मुद्दा उरतो तो महाराष्ट्रात आजवर विफलते पोटी जीव दिलेल्या कित्येक हजार शेतकऱ्यांचा आणि स्वत:चा जीव देऊन त्यांचा प्रतिनिधी ठरलेल्या भानाचा! खरंच मरणानं भानाची सुटका केली का? प्रश्न बुचकळ्यात टाकणारा आहे. महाराष्ट्रातल्या कित्येक हजार शेतकऱ्यांच्या एका ज्वलंत समस्येवर "मुक्ती "नं बोट ठेवलंय. या समस्येचं उत्तर कदाचित "मुक्ती " नसेलही, पण तमाम महाराष्ट्राला अंतर्मुख व्हायला भाग पाडण्याची ताकद मुक्तीमध्ये नक्कीच आहे. असा सार्थ विश्वास मात्र निर्माता आणि दिग्दर्शकाला नक्की आहे.



